# भारत-फ्रान्स परराष्ट्र कार्यालय सल्लामसलत (20 जानेवारी, 2025)

20 जानेवारी, 2025

भारत-फ्रान्स परराष्ट्र कार्यालय सल्लामसलतीचे (FOC) आयोजन 20 जानेवारी 2025 रोजी पॅरिस येथे करण्यात आले होते.  श्री. विक्रम मिसरी (भारताचे परराष्ट्र सचिव) आणि श्रीमती ॲनी-मेरी डेस्कोट्स (सरचिटणीस, फ्रान्सचे युरोप व परराष्ट्र मंत्रालय) यांच्या सह-अध्यक्षतेखाली पार पडली.  परराष्ट्र सचिवांनी श्री.जीन-नोएल बॅरोट (फ्रान्सचे युरोप आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री) आणि श्री. इमॅन्युएल बोने ( फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांचे राजनैतिक सल्लागार) यांची देखील भेट घेतली.

2. बैठकीदरम्यान उभय बाजूंनी भारत-फ्रान्स परिप्रेक्ष्य 2047 आराखड्याच्या पार्श्वभूमीवर द्विपक्षीय सहकार्याच्या विविध पैलूंचा सर्वसमावेशक आढावा घेतला.  या चर्चेत प्रतिबंध, नागरी आण्विक ऊर्जा, अंतराळ, सायबर आणि डिजिटल, एआय, संस्थात्मक संवाद यंत्रणा आणि नागरिक परस्पर संबंध आदान-प्रदान आणि सांस्कृतिक संबंध प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांसह द्विपक्षीय सहकार्याच्या प्रमुख मुद्द्यांचा समावेश होतो.  उभय बाजूंनी उच्च-स्तरीय तंत्रज्ञान क्षेत्रातील द्विपक्षीय भागीदारी विस्तार बाबत सहमती व्यक्त केली.  याव्यतिरिक्त, पर्यावरणातील सहकार्य, हवामान बदल आणि आरोग्यात सहकार्य, इंडो-पॅसिफिकमध्ये सहकार्य, त्रिपक्षीय संवाद, तिसऱ्या जगातील संयुक्त विकास प्रकल्प आणि मध्य पूर्व आणि रशिया-युक्रेन संघर्षाशी संबंधित आंतरराष्ट्रीय समस्या आणि संकटे यासारख्या जागतिक आणि प्रादेशिक समस्यांवर देखील विचारांचे आदान-प्रदान करण्यात आले.

3. नागरी आण्विक ऊर्जा वरील भारत-फ्रान्स विशेष कृती दलाची बैठक देखील परराष्ट्र सचिव आणि सरचिटणीस यांच्या सह-अध्यक्षते खाली पार पडली.

पॅरिस

20 जानेवारी, 2025